मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक
# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १०४ ■ शुक्रवार, १८ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!
खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.
हॅलो प्रभात
सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव
सहज,जलद आणि स्मार्ट!

# पडळकर-आव्हाड समर्थकात तुंबळ हाणामारी

## राजकारणाचा दर्जा ढासळला : राजकारण गेले खालच्या पातळीवर

**मुंबई : हॅलो प्रभात**

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाली आहे. ज्यावरून राज्याच्या राजकारणाचा दर्जा ढासळ्याची आता सर्वच स्तरातून टीका होत आहे. आमदार जितेंद्र आव्हाडांचा नुकताच एक व्हिडिओ व्हायरल झाला होता.

त्यात त्यांनी गोपीचंद पडळकरांचं नाव न घेता टीका केली होती. त्यानंतर काल (१६ जुलै) गोपीचंद पडळकर यांच्या कारचा आव्हाडांच्या कार्यकर्त्यांना धक्का लागला होता. ज्यानंतर तिथे शिवीगाळ देखील झाली होती. या घटनेचे काल (दि.१७) थेट विधानसभेच्या लॉबीत पडसाद उमटले असून आता दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांची थेट कपडे फाटेपर्यंत हाणामारी केली. दरम्यान, ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून आता या प्रकरणाचे राजकीय पडसाद हे उमटू लागले आहेत.

दरम्यान , राष्ट्रवादीचे नेते जयंत पवार हे देखील काही वेळाने तिथे पोहोचले. आव्हाडांच्या संतप्त कार्यकर्त्यांनीही जयंत पाटील यांच्याकडेही तक्रार केली. या पडळकरांना मारणार, असं कार्यकर्ते जयंत पाटील यांना सांगत होते. शेवटी जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांची समजूत घालून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे, अधिवेशन दोन दिवसांनी संपणार असून विधानसभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ सुरू आहे. परवा भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यात शिवीगाळ झाली होती.



### आ.पडळकर यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**हाणामारीची माहिती मिळताच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी तत्काळ आमदार गोपीचंद पडळकर यांना कॅबिनमध्ये बोलवून घेतलं. यात बैठकीत गोपीचंद पडळकर यांची मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांकडे तक्रार केल्याचे समजते.**

महत्वाचे म्हणजे लोकशाहीच्या मंदिरामध्ये सर्वसामान्यांचे प्रश्न मंडण्याएवजी शिवीगाळ आणि मारामारी सुरू असल्याने राज्याच्या भवितव्यावर आता चिंता व्यक्त होत आहे.

यावेळी काही आमदारांनाही याचा त्रास झाला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत अहवाल आल्यानंतर कारवाईचे आश्वासन दिले आहे.

**संपूर्ण महाराष्ट्राला दिसलं की हल्ला कोणी केला, आम्हाला यापेक्षा जास्त काही पुरावा द्यायचा नाही. जर तुम्ही विधानसभेत गुंडांना प्रवेश देणार असाल, ते आमच्यावर हल्ला करणार असतील तर आमचे लोक सुरक्षित नाहीत. मला शिवीगाळ केली, मारण्याची धमकी दिली. हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते. विधानभवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला आमदार राहायचं, आमचा काय गुन्हा आहे.**

**• आ.जितेंद्र आव्हाड**

## संक्षिप्त...

### शेंबवणेतील पाझर तलाव फुटला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्ह्यातील शेंबवणे (ता. शाहूवाडी) येथे लाखो रुपये खर्चून उभारण्यात येत असलेला पाझर तलाव फुटल्याने कोट्यवधी लिटर पाणी वाया गेले असून, सुमारे ३५ एकर शेती मातीखाली गेली आहे. जलसंधारण अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या आणि नियोजनशून्य कामाचा हा परिणाम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### बार पडले रिकामे मैदाने झाली हाऊसफुल्ल!

**सांगली : हॅलो प्रभात**

मद्यपींची गर्दी आता शहरात मोकळ्या सार्वजनिक ठिकाणी, तर ग्रामीण भागात माळावर व रानात दिसू लागली आहे. दारूच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे बारमधील गर्दी हळूहळू कमी होऊ लागली आहे.

या ओपन बारमुळे सार्वजनिक ठिकाणी दिवसेंदिवस दारू पिणाऱ्यांची वाढत असलेली संख्या आणि त्याकडे पोलिस करत असलेले दुर्लक्ष यामुळे महिलांच्या सुरक्षिततेबरोबरच सामाजिक शिस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### कृत्रिम फुलांवर सरकार घालणार बंदी

**सातारा : हॅलो प्रभात**

कृत्रिम फुलांमुळे कॅन्सरसारखे रोग होण्याची शक्यता जास्त असते. या कृत्रिम फुलांमुळे आरोग्य, शेतकरी अर्थकारण आणि पर्यावरणांवर परिणाम होत असून या फुलांची निर्मिती, आयातीवर सरकारने बंदी घालावी, अशी आ. महेश शिंदे यांनी केलेली मागणी राज्य सरकारने मान्य केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी या विषयावर चर्चा झाली असून कृत्रिम फुलांवर बंदी घालण्यात येत असल्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी जाहीर केले.

### पाचगणीत रॅगिंग विद्यार्थ्यांची सुरक्षा ऐरणीवर

**सातारा : हॅलो प्रभात**

शालेय कामकाज व विद्यार्थी विकास व सुरक्षितेसाठी विविध प्रकारच्या १५ समित्या स्थापन करण्यात येतात. तर महाविद्यालय स्तरावर अँटी रॅगिंग कमिट्या स्थापन असतात. तरी देखील कुठे रॅगिंग तर कुठे मानसिक शोषणाच्या घटना घडत आहेत. पाचगणीतील विद्यार्थ्यांच्या रॅगिंगच्या घटनेने अवघे समाजमन पुन्हा एकदा हेलावले आहे.

होस्टेलमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. पालकांमध्ये धास्ती वाढली असून महाविद्यालयांप्रमाणेच शाळास्तरावर तसेच हॉस्टेलमध्येही ॲण्टी रॅगिंग कमिट्या ॲक्टीव्ह करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# शरद पवार गटाच्या अनेकांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील राष्ट्रवादी शरदपवारगटाचे जिल्हापरिषदेचे माजी सदस्य भूषण काशिनाथ पाटील, माजी उपनगराध्यक्ष भगवान बापु पाटील यांच्यासह चाळीसगावमधील अनेक कार्यकर्त्यांनी गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार मंगेश चव्हाण, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.



यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की मंत्री गिरीश महाजन आणि आ. मंगेश चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात विकासाच्या कामांचा धडाका लावला आहे. विकासात्मक दृष्टीकोन ठेवत या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे त्यांचा विश्वास सार्थ ठरवू असेही त्यांनी नमूद केले.

भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये दिपक कच्छवा, दीपक पवार, उदय वाघ, हितेश व्यास आदींचा समावेश आहे.

# दिनकर दहिफळे यांचा भाजपामध्ये प्रवेश

**नांदेड : हॅलो प्रभात**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम, अर्थ सभापती दिनकर दहिफळे, किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे तसेच ८ संचालकांनी गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत केले.



यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. तुषार राठोड, नांदेड जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजुरकर, नांदेड उत्तर अध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

आज प्रवेश केलेल्या सर्वांच्या साथीमुळे भाजपाला नांदेड आणि संपूर्ण मराठवाड्यात बळ मिळेल असा विश्वास खा. अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी शरद पवार गटातून भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये किनवटचे प्रदेश युवक सचिव अजित साबळे, किनवट बाजार समितीचे संचालक श्रीराम कांदे, युवक तालुका अध्यक्ष तसेच किनवट बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, सुनील घुगे, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्जमवार, विद्या दासरवार, कुसुम मुंडे आदींचा समावेश आहे.

# डी.वाय.पाटीलच्या ४२ विद्यार्थ्यांची विविध कंपनीत निवड



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या ४२ विद्यार्थ्यांची आर्किटेक्चर व इंटीरियर डिझाईन क्षेत्रातील नामवंत कंपन्यामध्ये निवड झाली आहे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मेगा प्लेसमेंट ड्राइव्हद्वारे ही निवड झाली आहे.

अंतिम वर्षाच्या बी.आर्क. विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या मेगा प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये पुणे, कोल्हापूर, मुंबई, बंगलोर, हैदराबाद आणि अहमदाबाद येथील आर्किटेक्चर व इंटीरियर डिझाईन क्षेत्रातील एकूण २५ नामवंत कंपन्यांनी सहभाग नोंदवला.

त्यामध्ये हाफिज कॉन्ट्रॅक्टर अँड असोसिएट्स, मुंबई, मेनहर्टझ बंगलोर, अनुपम डे असोसिएट्स मुंबई, द बॉक्स डिझाईन पुणे, डिझाईन वैन गोवा, ट्राय डिझाईन असोसिएट्स पुणे, आर्चलँड कोल्हापूर अशा नामवंत कंपन्यांनी सहभाग घेतला होता. ऑफलाइन आणि ऑनलाइन अशा मिश्र स्वरूपात विद्यार्थ्यांशी संवाद साधून ४२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.

या यशस्वी मेगा प्लेसमेंट ड्राइव्हचे समन्वयन प्रा. पूजा जिरगे, प्रा. संतोष आळवेकर आणि प्रा. तन्वी शेटके यांनी केले.

अधिष्ठाता (सीडीसीआर) प्रा. सुदर्शन सुतार व ट्रेनिंग व प्लेसमेंट मकरंद काईगडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ.ए.के. गुप्ता, प्राचार्य डॉ.संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ.लितेश मालदे, स्कूल ऑफ आर्किटेक्चरचे विभागप्रमुख प्रा.इंद्रजीत जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

# ४५५ कोटींच्या वारणा उद्भव योजनेस मंजुरी मिळावी

### आ.गाडगीळ यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महापालिका क्षेत्रात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढ होत आहे. परिणामी सध्याची नळ पाणीपुरवठा योजना अपुरी ठरत आहे.

त्यामुळेच सुधारित सांगली व कुपवाड नळपाळीपुरवठा योजनेस (वारणा नदी उद्भव ) शासनाने तातडीने मंजुरी द्यावी.तसेच या योजनेसाठी ४५५ कोटी रुपयांचा निधी मिळावा, अशी मागणी आमदार सुधीरदादा गाडगीळ यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या दरम्यान मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन दिले. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्याबरोबर या योजनेसंदर्भात सविस्तर चर्चाही केली.

आ.गाडगीळ यांनी निवेदनातून म्हटले आहे की, सांगली, कुपवाड परिसरात लोकसंख्या वाढीमुळे पाण्याचा पुरवठा सुरळीतपणे होत नाही. यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत कार्यक्रमांतर्गत सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.या योजनेत सांगली



शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या वारणा नदी हा उद्भव धरण्यात आला आहे. वारणा नदी ही प्रदूषण विरहित असल्याने सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजनेतून नागरिकांना शुद्ध व भरपूर पाण्याचा पुरवठा होणार आहे. आमदार गाडगीळ यांनी सांगितले की, सांगली,मिरज, कुपवाड महापालिकेच्या स्थायी समितीने प्रशासक ठराव क्रमांक ३/२३५ अन्वये दि. १३ मार्च २०२४ नुसार ह्या योजनेला मान्यता दिली आहे. योजनेसाठी सन २०५७ ची ११ लाख २८ हजार लोकसंख्या गृहीत धरून ४५५ कोटी रुपयांचा निधी मागण्यात आला आहे. तरी या योजनेस मंजुरी देऊन तो निधीही तातडीने मंजूर करावा. त्यामुळे सांगली आणि कुपवाडमधील नागरिकांना पुरेसा आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा होऊ शकेल.

### एसटीपी प्लांटला मंजुरी द्यावी

**सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेच्या ४५ एमएलडीच्या एसटीपी प्लांट बांधण्याच्या प्रस्तावास नगरोत्थान योजनेतून शंभर टक्के निधी देऊन मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार गाडगीळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. या योजनेसाठी ९३ कोटी ५१ लाख रुपयांचा सविस्तर प्रकल्प प्रस्ताव एक वर्षीपूर्वी शासनास सादर केला आहे व तो प्रलंबित आहे. त्यासही मंजुरी द्यावी अशी मागणी आमदार गाडगीळ यांनी केली.**

# सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्यांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी : मंत्री बावनकुळे

**मुंबई : हॅलो प्रभात**

नंदुरबार येथे सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्याने रेल्वे स्टेशन रस्त्यावर तहसीलदार यांच्या बंद असलेल्या निवासस्थानी अनधिकृत कार्यालय सुरू केले. ह्या मंडळ अधिकारी यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या सहीचे व विनासहीचे दस्तऐवज तयार केले.

यासेवानिवृत्तमंडळअधिकारी यांच्या कारभाराची विभागीय आयुक्त यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. नंदुरबार येथील प्रकरणात सदस्य डॉ विजयकुमार गावित यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे ४५ प्रकरणे तसेच ३८ प्रकरणे सह्या नसलेली आहेत. या प्रकरणी मंडळ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच आरोपीस अटक करण्यात आली आहे. उशिरा गुन्हा दाखल केल्याप्रकरणी संबंधित तहसीलदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल. याप्रकरणी संबंधित संपूर्ण यंत्रणेची चौकशी करण्यात येईल.

# महाडिक अभियांत्रिकीने उत्कृष्ट प्लेसमेंटची परंपरा जपली

### विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात प्लेसमेंट डे संपन्न

**पेठ : हॅलो प्रभात**

येथील श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था संचलित नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने यंदाही उत्कृष्ट प्लेसमेंटची आपली परंपरा जपली. मॅकॅनिकल,सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रिकल अशा सर्वच अभ्यासक्रमातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे.निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्लेसमेंट डे साठी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक,कार्यकारी संचालक डॉ.महेश जोशी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील आणेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्लेसमेंट झालेल्या कंपन्यांमध्ये टि.सि. एस.,कॅपजेमिनी, टेक्नोसर्किट इंडिया प्रा. लि.,बजाज ऑटो लि., कमिन्स इंडिया टेक्नॉलॉजी,अल्ट्राटेक सिमेंट,किर्लोस्कर ब्रदर्स लि.,घरडा केमिकल्स लि.आदी नामांकित कंपन्यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत असताना संस्थेचे सचिव राहुल महाडिक म्हणाले,आजवर महाविद्यालयाने राखलेली प्लेसमेंटची परंपरा अभिमानास्पद असून याद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.महाविद्यालयातील संस्कारातून घडलेले हे सक्षम विद्यार्थी विविध क्षेत्रात नक्कीच यशस्वीपणे वाटचाल करतील. संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ.महेश जोशी म्हणाले,इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूट यामध्ये साधलेला परस्पर संवाद आणि प्लेसमेंटच्या दृष्टीने राबवण्यात आलेले विविध महत्त्वपूर्ण उपक्रम यामुळेच महाविद्यालयाला प्लेसमेंटच्या मोठ्या संधी उपलब्ध करण्यात यश आले आहे.

यावेळी ट्रेनिंग प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा. विश्वजीत शिंगे यांच्यासह समन्वयक प्रा.अमृत पाटील, प्रा.आकांक्षा जाधव, प्रा.साहिल मुलाणी, प्रा.अक्षता पाटील यांनी संयोजन केले.

उपप्राचार्य निलेश साने, विविध विभागांचे प्रमुख, सर्व स्टाफ यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



**गाळा भाड्याने देणे**

**ऑफिस फर्निचरसह गाळा भाड्याने देणे आहे.**

(200 sqft.)

(स्टँड समोर,मोक्याच्या ठिकाणी)

पत्ता : कल्प-कुंज विहार

पारेख मेडीकल जवळ

स्टँड रोड,सांगली.

संपर्क

7517219001




## वृद्धाश्रम म्हणजे तुरुंगच ?

वृद्धाश्रम म्हणजे तुरुंगच असतं त्या म्हाताऱ्या लोकांसाठी. कारण तिथं मायेचं पाखरु कोणीच दिसत नाही. ना स्वतःच्या अंगाखांद्यावर खेळिवलेला मुलगा दिसत, ना स्वतःचं फोट फाडून काढलेला गर्भ दिसत. तो गर्भ, जो बालपणात हरवला असल्यास किंवा डोळ्यासमोरुन ओझल झाल्यास त्या गर्भाला उदयास आणणारी मंडळी तिनही लोक एकत्र करीत असतात नव्हे तर पिंजून काढत असतात. एक असाच व्हिडिओ सोशल मिडीयावर येवून धडकला. ज्या व्हिडिओतून मुलामध्ये असलेला संस्कार दाखवला होता. तो संस्कार की वडिलाला विसरायचा आजार असतांना व वडील हरवले असतांना त्या मुलानं त्यांच्यासाठी बराच परीसर पिंजून काढला. शेवटी वडिलाला शोधलंच. त्यावर विचार मांडणारा एक विचारवंत म्हणाला की त्या वडिलाला तसा जर आजार आहे तर त्यांना वृद्धाश्रमात का टाकू नये. ते वृद्धाश्रम की ज्या वृद्धाश्रमात वृद्धांची पुरेपूर काळजी घेतली जाते. तो विचारवंत आपले मत मांडून मोकळा झाला. कारण त्याची आईदेखील त्यानं त्याच वृद्धाश्रमात ठेवली होती व तिची फार काळजी घेतली जात होती त्या वृद्धाश्रमात. म्हणूनच त्याचं ते सुचवणं. वृद्धाश्रमात सर्व सोयी असतात वृद्धांना. त्यांना वेळोवेळी औषधोपचार दिला जातो. जेवणाखावण्याचे वेळापत्रक असते. दर आठ दिवसानं त्यांच्या मनोरंजनासाठी काही कार्यक्रम राबविण्यात येतात. जेवनातही दररोज बदलाव असतो व खमंग जेवन मिळत असतं. परंतु सुख असतं का? सुखाचा विचार केल्यास सुख नसतंच. याबाबत उदाहरण म्हणून एक कथा सांगता येईल. कथा जुनीच आहे. सर्वांनाच माहित आहे व इथं उदाहरणादाखल देत आहे. कहाणी अशी की एक राणी. ती फार दुःखी होती. तिला झोपेचा आजार होता व तिला झोपच येत नव्हती. राजानं तिला झोप यावी म्हणून बरेच प्रयत्न केले. ज्या प्रयत्नात ऐकदा तिच्यासाठी राजानं आपल्या राजवाड्यात खास व्यवस्था केली. एकदा तिच्या अंथरुणावर फुलं अंथरली. वाटलं की मऊशार फुलांच्या सुगंधानं तिला झोप येईल. परंतु रात्र जाताच व सकाळ होताच जेव्हा राजा तिच्या कक्षात गेला व विचारलं की तिला झोप आली का? त्यावर तिचं उत्तर नाही असंच होतं. त्यावर कारण विचारलं असता तिनं उत्तर दिलं की मला एक कळी टोचत होती. समाजात दोन गट असतात. एक श्रीमंत व दुसरा गरीब. गरीबांना कितीही धन दिलं तरी त्याचं राहणीमान कधीच बदलणार नाही. तो गरिबांसारखाच राहिल. तेच ते फाटके कफडे अंगावर परिधान करेल आणि त्याला झोपही साध्या जमीनीवरच येईल. याउलट श्रीमंतांचं आहे. श्रीमंत व्यक्ती जर गरीब झालाच तर जगतांना त्याला जीव घुटमळून जाईल. वाटल्यास त्याची आत्महत्याही घडेल. हेच तत्व वृद्धांबाबतीही लागू पडते. वृद्धांना जेव्हा वृद्धाश्रमात टाकलं जातं, तेव्हा त्यांचं सुख हरवतं. स्वातंत्र्यही तेवढंच हरवतं. कारण वृद्धाश्रमात पाहिजे तसं व तेवढ्या प्रमाणात स्वातंत्र्य नसतं. आनंदही मुळातच नसतं. म्हातारपणातील आनंद हा वृद्धाश्रमातील विविध उपक्रमात वा वृद्धाश्रमात राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमात नसतो. आनंद असतो, ती नातवंड खेळिवण्यात. त्यांच्या मागं लागून त्यांच्याशी वटवट करण्यात. त्यांची वटवट ऐकून घेण्यात. ज्याचा मुलांना व खासकरुन सुनांना राग येतो व सुनांना राग आलाच तर तिच्या इशाऱ्यावर चालणारे तिचे पती नाईलाजास्तव तिनं आपल्या आई वडिलांना वृद्धाश्रमात टाक म्हणताच तो व्यक्तीही नाईलाजास्तव आटल्या आईवडिलांना वृद्धाश्रमात टाकतो. त्यावेळेस असा विचार करीत नाही की मी जेव्हा लहान होतो, तेव्हा याच पाखरांनी माझं रक्षण केलं. मला त्यागलं नाही वा मला सोडून दिलं नाही. उन्हातून सावलीत नेलं. अन्न भरवलं. शिक्षण शिकविलं. मला माझ्या लायक बनवलं नव्हे तर आत्मनिर्भर बनवलं. आज जो काही मी आहे, ते माझ्या आईवडिलांमुळेच आहे. सेवा...... म्हणतात की दीन, दलीत, गरीब, अनाथ, अपंग व वृद्ध यांची सेवा करावी. त्यांचा आशिर्वाद बहुमोल आहे व तो मिळावा. बरेच लोकं सेवा करतात व जे करतात, ते बोलून दाखवत नाहीत. आज मुलं मुली समान आहेत व या समानतेच्या काळात मुलगीही मायबापांना तेवढीच प्रिय असते. जेवढा मुलगा असतो. तसंच मुलांना आईवडीलही तेवढेच प्रिय असतात. परंतु ते प्रिय असतात, त्यांचे विवाह होईपर्यंत. एकदा का विवाह झाला आणि मायबापांना थोडं म्हातारपण आलं की मुलांचे विचार बदलतात. मुलगी असेल तर ती आपल्या पतीच्या विचारानं चालते. स्वतः सक्षम असूनही ती पतीच्याच आज्ञेत वागते. पती जसं म्हणेल तसं. त्यानं पश्चिमेला पुर्व दिशा म्हटली की ती पुर्व. तेच घडतं मुलाच्याही बाबतीत. मुलगाही विवाह होताच आपल्या पत्नीच्याच आज्ञेत वागते. ती जे म्हणेल ते. कारण त्यांना धाक असतो. धाक असतो की त्या त्या घटकानं काही कमीजास्त केल्यास वा सांगीतलेली आज्ञा न मानल्यास वा न पाळल्यास ते जोडीदाराला सोडून जातील. अनब तसं घडतंही. कारण अलिकडील काळात संस्कार हे तुटत चाललेले आहेत. आजच्या काळातील संस्कारात मी, माझी पत्नी वा पती व माझी मुले. एवढेच अभिप्रेत आहे. आईवडील आजच्या काळात प्रत्येकाला नकोच आहेत. आईवडील असले तर प्रचंड त्रासच वाटतो. अशा ठिकाणी म्हाताऱ्या मंडळींना पाठवणं म्हणजे त्यांच्या मनातील संपुर्ण स्वातंत्र्याची गळचेपी नव्हे तर हत्याच आहे. अशी हत्या कोणत्याच जन्मदात्या मुलाने करु नये. कारण आपल्याला आपल्याच जन्मदात्याने एवढं आत्मनिर्भर बनवलंय की त्याच आधारावर आपण त्यांना वृद्धाश्रमात टाकायलाही मागपुढं पाहात नाही. असं टाकून आपण पापाचं भागीदार बनत चाललोय. जे पापकर्मच पुढे जावून आपलीही रवानगी वृद्धाश्रमात करायला मागंपुढं पाहणार नाही.

# एक जबरदस्त साहित्यिक : अण्णाभाऊ साठे

**हॅलो प्रभात**

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १८ जुलै रोजी पुण्यतिथी आहे. संपूर्ण महाराष्ट्र या दिवशी अण्णाभाऊंना श्रद्धांजली अर्पण करतो. मातंग समाजात जन्मलेल्या अण्णाभाऊंना महाराष्ट्र ओळखतो तो महान शाहीर तसेच दीन-दुबळ्यांचे उपेक्षितांच्या जीवनाचे वास्तव चित्रण करणारा पहिला दलित साहित्यिक म्हणून.**



**१८ जुलै : पुण्यतिथी**

तुकाराम भाऊराव ऊर्फ शिवशाहीर अण्णाभाऊ साठे ह्यांचा जन्म १ ऑगष्ट १९२० या दिवशी सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात वाटेगाव या खेड्यात मातंग समाजात झाला आणि अण्णाभाऊ साठे नावाचा क्रांती सूर्य उगवला.त्यांच्या वडिलांचे नाव भाउराव सिद्धोजी साठे व आईचे नाव वालुबाई होते. त्यांना लहान भाऊ शंकर व बहीण जाईबाई. बारष्याचे दिवशी त्यांचे नाव तुकाराम ठेवण्यात आले. संत तुकारामाप्रमाणे हाही तुकाराम मोठा साहित्यिक झाला. साहित्यिक क्षेत्रातील चमत्कारी ठरला. अर्थात अण्णाभाउंच्या बाल्यावस्थेत कोणी म्हटले असते, की हा मुलगा आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त करील, तर असे भाकित ठरविणाऱ्याला वेडेच ठरविले गेले असते. त्याचे कारण म्हणजे, एक तर पददलित जातीकुळी व विलक्षण दैन्यावस्था, रोज बारा वाजताची वेळ कशी भागेल याचीच भ्रांती असायची अण्णाभाऊंची आई विचारी होती. पूर्वी जिजाबाईने शिवबाला रामायण-महाभारतातील कथा सांगितल्या, तद्वतच वाळूबाईंनी छोट्या तुकारामाला वीर लहुजी वस्ताद, फकीरा, वीर सत्तू , पिराजी यांच्या गोष्टींचे संस्कार केले.

**'माझी मैना गावाकड ऱ्हांयली , माझ्या जीवाची होतीया काह्यली'** यासारख्या ठसकेबाज लावण्या आणि 'फकीरा', 'वारणेचा वाघ', 'माकडीची माळ', 'मास्तर' यांसारख्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. मातंग समाजात जन्मलेले अण्णाभाऊ अल्प शिक्षित असले तरी त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या समाजमनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. त्यांच्या अंर्तमनाचा तो प्रकट हुंकार आहे. समाजपरिवर्तनाचा विचार मांडणारा हा साहित्यिक स्वातंत्र चळवळी च्या जनसागरात गुंतलेला लढाऊ माणूस अण्णांनी आपल्या लेखणीतून उभा केला. ग्रामीण, पददलित, आणि लाचारीचे जिने जगणारी माणसे त्यांनी आपल्या खास शैलीत उभी केली. फकीराप्रमाणे मातंग असणारा नायक, एक अजस्त्र ताकदीचा व धैर्याचा महामेरू, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या रणांगणात दिनदलितांच्या व उपेक्षितांच्यावतीने लढणारा नायक म्हणून त्यांनी 'फकीरा'त उभा केला आहे. फकीरा ही कादंबरी त्याकाळात फार प्रसिद्ध झाली होती आणि सर्वोत्कृष्टही ठरली होती. याशिवाय पस्तीस कादंबऱ्या, तीन नाटके, अकरा लोकनाट्ये, तेरा कथासंग्रह आणि सात चित्रपट कथा लिहिणाऱ्या अण्णाभाऊंनी फक्कड लावण्याही लिहिल्या. शाहीर गवाणकरांच्या 'लालबावटा' कलापथकाद्वारे अनेक तमाशेही केले. जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांचे चित्रण करणाऱ्या अण्णाभाउंनी **'मुंबई नगरी बडीबांका, जशी रावणाची लंका, वाजतोय डंका चौहुमुलुखी'** अशा शब्दात मुंबईचे चित्र अण्णाभाऊंनी रेखाटले.

अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राला एक शाहीर म्हणून परिचित असले तरी कथा आणि कादंबरी हे साहित्यप्रकारही त्यांनी ताकदीने हाताळले. तांत्रिकदृष्ट्या पूर्ण निरक्षर, अशिक्षित व्यक्ती असणाऱ्या अण्णाभाऊंनी मराठी साहित्यातील लोकवाङ्मय, कथा, नाट्य, लोकनात्य, कादंबऱ्या, चित्रपट, पोवाडे, लावण्या, वग, गवळण, प्रवास वर्णन असे सर्वच प्रकार सशक्त व समृद्ध केले. तमाशा या कलेला लोकनाट्याची प्रतिष्ठा मिळवून देण्याचं श्रेय अण्णाभाऊंना दिले जाते. पोवाडे, लावण्या, गीतं, पदं या काव्यप्रकारांचा त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेत विचारांच्या प्रचारासाठी वापर केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय प्रश्नांविषयी महाराष्ट्रात त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी शाहिरीतून दिलेले योगदान महत्त्वाचे आहे.

१९४४ ला त्यांनी 'लाल बावटा' पथक स्थापन केले आणि बघताबघता ते शाहीर झाले. 'माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काह्यली।।' ही त्यांची गाजलेली लावणी होती. अण्णाभाऊंनी छत्रपती शिवरायांचे चरित्र रशियापर्यंत पोवाड्यातून सांगितले. पुढे त्याचे रशियन भाषेमध्ये भाषांतर झाले आणि रशियन राष्ट्राध्यक्षांकडून त्यांचा सन्मानदेखील झाला. १६ ऑगष्ट १९४७ साली 'ये आझादी जुठी है, देश की जनता भुकी है' असा नारा शिवाजी पार्क वर दिला आणि त्या दिवशी पावसाने रौद्र रूप धारण केले होते. मात्र, तरीही अण्णाभाऊ मागे हटले नाहीत.

अण्णा भाऊंनी आपल्या लेखनकाळातील अल्पायुष्यात २१ कथासंग्रह आणि ३० पेक्षा अधिक कादंबऱ्याही लिहिल्या. त्यापैकी सात कादंबऱ्यांवर नामवंत दिग्दर्शकांनी मराठी चित्रपटही काढले. 'फकिरा' या कादंबरीला १९६१ साली राज्य शासनाच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कारही मिळाला आणि तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांनीही कादंबरीचे कौतुक केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा'मध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना वाटप करणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. 'वैजयंता' कादंबरीत प्रथमच तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. 'माकडीचा माळ' ही भटक्या-विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अतिशय सूक्ष्म चित्रण करणारी भारतीय साहित्यातील पहिली कादंबरी आहे. परंतु तिचीही योग्य नोंद तथाकथित समीक्षकांनी घेतली नाही. कोळसेवाला, घरगडी, खाण कामगार, डोअर किपर, हमाल, रंग कामगार, मजूर, तमाशातला सोंगाड्या अशा विविध भूमिका अण्णांनी वठविल्या. अण्णांनी आपले उभे आयुष्य चिरागनगर झोपडपट्टीत काढले. याच झोपडपट्टीत अण्णाभाऊंच्या एकापेक्षा एक श्रेष्ठ कलाकृतींची निर्मिती झाली. अण्णाभाऊ साठेंनी तीस कादंबऱ्या तसेच जवळजवळ अडीचशे ते तीनशे कथा लिहिल्या. त्यांचे साहित्य केवळ मराठी भाषेपुरतेच मर्यादित न राहता चौदा भारतीय भाषात तसेच जर्मन, इंग्रजी, झेक, पोलीश, रशियन इत्यादी परकीय भाषात भाषांतरीत झाले आहे. त्यांचे साहित्य जात, धर्म, देश, भाषा इ. बंधनांच्या पलीकडे पोहोचले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या साहित्यात संघर्ष, विद्रोह प्रकर्षाने जागोजागी जाणवतो. त्यांची पात्रे शोषित, दलित जनतेची दुःखे वाचकांपर्यंत वास्तवपणे पोहोचवतात. त्यांच्या 'निळू मांग, मकुल मुलाणी, भोमक्या, फुला, नसरू, दादा न्हावी' या पात्रांनी साऱ्या महाराष्ट्राला वेड लावले तसेच सर्वांना झपाटून टाकले. समाजातील दलित शोषित जनतेने जात-पात, धर्म, मानपान यांचा त्याग करावा व एक समतेवर आधारीत समाज निर्माण करण्यात पुढाकार घ्यावा असे अण्णाभाऊंना प्रकर्षाने वाटत होते.

अण्णाभाऊंनी विविध साहित्य प्रकार हाताळले. कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या, लोकनाट्ये, पदे, गीते अशी विविध क्षेत्रे त्यांनी सहजगत्या पादाक्रांत केली. आपल्या साहित्यातून शोषण, अन्याय, अत्याचाराला विरोध करणे हेच त्यांनी ध्येय मानले व मानवी वृत्ती, प्रवृत्तीचे वास्तव दर्शन वाचकांना घडविले. शब्दांना अंगाराचे रूप देऊन दलितांच्या निर्जीव मनाला चेतवत अण्णाभाऊ मराठी साहित्यातील अढळ पदावर विराजमान झाले आहेत.

तत्कालीन मोरारजी सरकारने त्यांच्या 'माझी मुंबई अर्थात मुंबई कुणाची?' या नाटिकेवर बंदी आणली तरी अण्णाभाऊ आणि त्यांच्या साथीदारांनी तिचे प्रयोग करून महाराष्ट्र पेटता ठेवला. कारण यातील 'माझी मैना' हे गाजलेले गीत लिहून अण्णाभाऊंनी मुंबईबद्दलच्या सर्वसामान्यांच्या भावनाच या नाटीकेमध्ये व्यक्त केल्या होत्या.

अण्णाभाऊंच्या साहित्याचा गौरव महाराष्ट्रातील जनतेने त्यांच्या जिवंतपणीच केला. पण शासनाने त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला पारितोषिक देण्याशिवाय काहीच केले नाही. अण्णाभाऊंनी कित्येक कथा कादंबऱ्या, गीते, नाटके लिहिली त्यापैकी बरेच साहित्य प्रसिद्ध झालेले असले तरी अजूनही बरेच साहित्य अप्रकाशित आहे किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील पण माणूस म्हणून जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच आणि मला भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे. या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रांतून आपले अस्तित्व दाखवू लागला. अण्णाभाऊंनी उभ्या आयुष्यात मुख्यत: दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंत लोकांकडून होणारे गरीबांचे शोषण आणि अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणूक. अण्णाभाऊंनी या गोष्टीवर आपल्या लेखणीने सतत कोरडे ओढले, प्रहार केले.

***● पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत या साहित्याचा अतिशय मोलाचा उपयोग झालेला आहे. अण्णाभाऊंचे हे साहित्य जपणे हे शासनाचे तसेच सर्व समाजाचे कर्तव्य आहे. जनसामांन्यांच्या या लोकशाहिराचे दिनांक १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले. खास करून अण्णाभाऊ ज्या समाजात जन्मले त्या मातंग समाजाने हा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी विशेष दखल घेऊन प्रयत्न केले पाहिजेत. हीच अण्णाभाऊंना त्यांच्या पुण्यतिथिनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.***

## भारतातील पहिला एक्स्पेरिअन्सेस-टू-कंझ्युमर ब्रॅंड 'दिलसे' लॉंच

**मुंबई : हॅलो प्रभात**



मुंबईतील प्रतिष्ठित एक्स्पेरिमेण्टल थिएटर, एनसीपीए येथे १५ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या लाइव्ह नाट्य प्रदर्शनादरम्यान दिलसे, द हॅप्पीनेस कलेक्टिव्ह प्रायव्हेट लिमिटेड हा भारतातील पहिला एक्स्पेरिअन्सेस-टू-कंझ्युमर (ई२सी) ब्रॅंड लॉंच करण्यात आला. 'दिलसे - द लव्ह थिएट्रिकल' असे शीर्षक असलेले हे दोन तासांचे तल्लीन करणारे सादरीकरण पारंपारिक ब्रॅंड इव्हेंट नव्हते, तर सखोल भावनिक अनुभव होता, ज्यामध्ये मूळ कविता, लाइव्ह म्युझिक, नाट्यकथन आणि सिनेमॅटिक दृश्ये यांचे संयोजन पाहायला मिळाले. हर्षवर्धन चौहान यांनी या शोची संकल्पना मांडण्यासोबत लेखन देखील केले. तसेच त्यांनी मुख्य पात्राची भूमिका देखील बजावली.

## ठाणे जिल्ह्यातील हातभट्टीवर धाडसत्र ९.१६ लाखाचा मुद्देमाल जप्त

**मुंबई : हॅलो प्रभात**

ठाणे जिल्ह्यातील अंजूरगाव व आलीमघर खाडीमध्ये अवैध हातभट्टी केंद्र नष्ट करण्यासाठी हातभट्टी केंद्रावर धाडसत्र राबवून धडक कारवाई करण्यात आली. पावसाचा फायदा घेत या खाडीत अवैध हातभट्टी मद्य निर्मितीत वाढ झाली होती. त्याअनुषंगाने उत्पादन शुल्कच्या प्रशिक्षित जवानांनी बोटीने जावून सर्व हातभट्टी मद्य निर्मिती ठिकाणे १५ जुलै रोजी नष्ट केली. या कारवाईत एकूण ९ लाख १६ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायदा १९४९ अंतर्गत ०३ गुन्हे नोंद करण्यात आले. ठाणे जिल्ह्यामध्ये सामूहिक मोहिम राबवून केलेल्या कारवाईत २०० लिटर क्षमतेचे १७८ ड्रम व १००० ली. क्षमतेचे ३ बॉयलर त्यामध्ये ३३ हजार ६०० लीटर रसायन व ३५ ली. गावठी दारु, इतर हातभट्टी साहित्य जप्त करण्यात आले. यावेळी काही मुद्देमाल नाशवंत असल्याने तो जागीच नष्ट करण्यात आला.

## कोल्हापूरमध्ये 'रिटेल आउटलेट'चे उद्घाटन

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




'ई-बाइकगो प्रायव्हेट लिमिटेड' या एसर ऑफिशियल लायसन्सधारक आणि देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या 'इलेक्ट्रिक मोबिलिटी स्टार्टअपपैकी एक असलेल्या कंपनीने कोल्हापूरमध्ये नवीन 'एसर इलेक्ट्रिक वाहनां'चे रिटेल आउटलेट सुरू केल्याची घोषणा केली आहे. कंपनीच्या देशव्यापी विस्ताराचा एक भाग म्हणून कोल्हापूरमधील हे केंद्र १५ नव्या ठिकाणांपैकी एक असून, या आउटलेटमध्ये एसर-ब्रॅंडेड इलेक्ट्रिक दुचाकींचा अनुभव ग्राहकांना घेता येणार आहे. 'इको-फ्रेंडली' वाहतूक आणि स्मार्ट मोबिलिटीवर शहराचा वाढता भर लक्षात घेता 'ई-बाइकगो'चे हे नवीन स्टोअर रिटेल नेटवर्कमधील एक रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाची भर घालत आहे. ई-स्कूटर, ई-बाइक आणि ई-सायकलसह 'एसर ब्रॅंडेड' इलेक्ट्रिक वाहने सादर करून स्टायलिश, शाश्वत आणि उच्च-कार्यक्षमतेची वाहने उपलब्ध करून देणे, हे उद्दिष्ट आहे. रस्ते आणि भूभागाला साजेशी असलेली ही नावीन्यपूर्ण वाहने आधुनिक गरजांना पाठबळ देतील.

## 'द ओबीसीज अपरायझिंग' पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबई : हॅलो प्रभात**

'द ओबीसीज अपरायझिंग: अ न्यू नॅरेटिव्ह ऑन सोशल जस्टिस अँड पॉलिटिकल रिप्रेझेंटेशन' हे एक नवीन पुस्तक अलीकडेच प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकाचे सह-लेखक मध्य प्रदेशातील सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाचे प्रधान सचिव पी. नरहरी, आयएएस आणि उच्च न्यायालयाचे वकील पृथ्वीराज सिंह आहेत. हे काम भारतातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) साठी सामाजिक न्याय आणि राजकीय प्रतिनिधित्वाचे समर्थन करते, जे पाच वर्षांच्या सखोल संशोधन आणि सहकार्यातून निर्माण झाले आहे. या पुस्तकाच्या तेलुगू आणि इंग्रजी आवृत्त्यांना वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून लवकरच भारतातील सर्व प्रमुख पुस्तकांच्या दुकानांमध्ये ते उपलब्ध होईल असे प्रकाशकांनी सांगितले.

## सलमान खान यांच्या हस्ते इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचा शुभारंभ

**मुंबई : हॅलो प्रभात**




बॉलिवूडचे सुपरस्टार सलमान खान यांच्या हस्ते इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगच्या (आयएसआरएल) दुसऱ्या हंगामाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. आयएसआरएलचे ब्रॅंड ॲम्बेसिडर असलेले सलमान खान यांची अफाट लोकप्रियता, सर्व वयोगटांमध्ये असणारे अपील आणि मोटरसायकल तसेच फिटनेसबाबतची विशेष आवड यामुळे हा खेळ निवडक चाहत्यांच्या चौकटीपलीकडे जाऊन मुख्य प्रवाहात पोहोचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या उद्घाटन सोहळ्यात सलमान खान यांनी आयएसआरएलमध्ये गुंतवणूकदार म्हणूनही सहभागी होण्याची घोषणा केली. या सहभागामुळे आयएसआरएल केवळ मोटरस्पोर्टप्रेमींसाठी नव्हे मनोरंजनासाठीही महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

## प्रॉपर्टी शेअरच्या ४७३ कोटीची सार्वजनिक ऑफर २१ जुलै रोजी उघडणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

PROPERTY SHARE

प्रॉपर्टी शेअर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (एसएम रीट) या भारतातील पहिल्या नोंदणीकृत लघु आणि मध्यम रिअल इस्टेट गुंतवणूक ट्रस्टने ट्रस्ट अंतर्गत त्यांची दुसरी योजना- प्रॉपर्टी शेअर टिटानियासाठी ट्रस्टची प्रमुख माहिती आणि योजनेची प्रमुख माहिती (ऑफर डॉक्युमेंट्स) दाखल केली आहे, जी एकूण ४७३ कोटी रुपयांपर्यंत आहे. इश्यू सोमवार, २१ जुलै २०२५ रोजी उघडेल आणि शुक्रवार, २५ जुलै २०२५ रोजी बंद होईल. इश्यूसाठी किंमतपट्टा प्रति टायटानिया युनिट १०.० लाख रु. ते १०.६ लाख रु. आहे. किमान बोलीचा आकार किमान गुंतवणूक रकमेसाठी १०,००,००० रुपये आहे. किमान १ टायटानिया युनिटसाठी आणि त्यानंतर १ टायटानिया युनिटच्या पटीत बोली लावता येतात.

नवे विचार...नवी सुरुवात

दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टॅंड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टॅंड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०

■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ **व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे** ■ **सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर** ■ **मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर**

हॅलो प्रभात
MY DISTRICT ३
शुक्रवार, १८ जुलै २०२५

## स्वयंसेविकांच्या मानधनाची प्रक्रिया सुर : मंत्री आबिटकर

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांचे मानधन केंद्रशासन आणि राज्य शासनाकडून देण्यात येते. केंद्रशासनाचा निधी आला नसल्याने मधल्या काळात मानधन प्रलंबित राहिले होते. आता निधी प्राप्त झाला असून मानधन वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. असे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत सांगितले.

# संमिश्र

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीत अपूर्वा कांबळे उत्तीर्ण



**गांधीनगर : हॅलो प्रभात**

विक्रम एज्युकेशन सोसायटी संचलित, न्यू इंग्लिश स्कूल, गडमुडशिंगी या शाळेतील कु.अपूर्वा अतुल कांबळे हि विद्यार्थीनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (आठवी स्कॉलरशीप) परीक्षेत कोल्हापूर जिल्ह्यात १०६ वी गुणानुक्रमाने उत्तीर्ण झाली आहे .शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हयात १०६ वी येण्याची शाळेच्या इतिहासातील ही पहिली उल्लेखनीय, कौतुकास्पद व प्रेरणादायी बाब आहे.कु.अपूर्वा हिला ३०० पैकी २४४ गुण (८१.३३%) मिळाले.विद्यार्थीनीस विक्रम एज्यूकेशन सोसायटीचे कार्याध्यम. डॉ.शरद शिंदेसो, जनरल सेक्रेटरी अशोक जाधव, उपकार्याध्यक्षा श्रीमती अरुणा देशमुख सर्व संचालक पदाधिकारी शाळेचे मुख्याध्यापक गुरख डी.ए. तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रकाश पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पोर्ले तर्फे ठाणे येथील प्रकाश पाटील यांचा वाढदिवस ४ जुलै रोजी साजरा करण्यात आला. प्रकाश पाटील यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या सर्वांकडून पुष्पगुच्छ न स्वीकारता शुभेच्छा म्हणून वह्या स्वीकारल्या. सर्व कार्यकर्त्याकडून मिळालेल्या वह्या पोर्ले येथील कुमार व कन्या विद्या मंदिर पोर्ले, शाळा नंबर २ मिशन शाळा व गोसावी वसाहत मधील विद्यामंदिर मध्ये गरजू विद्यार्थ्यांना वाटप करून सामाजिक बांधिलकीचे जतन केले. गरजू विद्यार्थ्यांना वह्या मिळाल्याने आनंद वाटत आहे. या कार्यक्रमाला प्रकाश पाटील, युवा नेते अभिलाष पाटील,भाऊसो चौगुले,अजित पाटील,सागर गायकवाड, माजी सरपंच प्रकाश जाधव, गणेश शेवाळे ,दत्तात्रय साळुंखे, सागर निर्मळे, शिक्षक धनाजी नांदगावकर व इतर शिक्षक वर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते.

## रेंदाळ गावास प्राथमिक आरोग्य केंद्राची मान्यता



**हुपरी : हॅलो प्रभात**

रेंदाळ गावाचे झपाट्याने होत असलेले नागरिकीकरण व मोठ्या प्रमाणात असलेला वस्त्र उद्योग व्यवसायामुळे लोकसंख्येमध्ये होत असलेली वाढ याचा विचार केला असता पायाभूत सुविधा देणे ग्रामपंचायतीला अडचणी होत असून तारेवरची कसरत होत आहे. तसेच सांडपाणी व्यवस्थापन व पावसाळ्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या या बळावत असून अस्तित्वात असलेले उपकेंद्र आरोग्याच्या सुविधा देण्यासाठी अपुरे पडत आहे. लहान मुले, महिला, पुरुष , वयोवृद्ध यांचे बाबतीतील आजारावर एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करता येतील या कामी ग्रामपंचायत हद्दीत प्राथमिक आरोग्य केंद्र आवश्यक होते सध्याची वस्तुस्थिती लक्षात घेता विभागवार उपकेंद्र करता आले असते परंतु भविष्याचा विचार करता प्राथमिक आरोग्य केंद्र होणे गरजेचे आहे याकरिता सविस्तर ग्रामपंचायतीच्या मासिक सभेला चर्चा झाल्यानंतर सदर आरोग्य केंद्राबाबत विहित नमुन्यातील प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांना पंचायत समिती मार्फत सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य सरकारकडून नॅशनल अथोरिटी ऐशोरन्स योजना राज्य शासन राबवणार असून सदर योजनेअंतर्गत आरोग्याच्या सक्षम सुविधा देता येतील या अनुषंगाने आम्ही केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावाल्या आरोग्य कमिटी जिल्हा परिषदेच्या बैठकीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र साठी मंजुरी मिळाली त्याबद्दल मा. आमदार अशोकराव माने बापू, आरोग्य अधिकारी जिल्हापरिषद, आरोग्य अधिकारी पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य सर्व सहकारी,हितचिंतक यांचे सहकार्य लाभले.

## सर्व महामार्ग रस्त्यांवर झाडांची लागवड करण्याच्या सूचना

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील सर्व महामार्ग, मोठे रस्ते प्रकल्प, राज्य मार्ग आणि ग्रामीण मार्ग यांच्या दुतर्फा देशी झाडांची लागवड करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. त्या अनुषंगाने सर्व संबंधितांना पुन्हा सूचना देण्यात येतील. तसेच झाडे लावण्यासोबतच झाडे जगणे महत्वाचे असल्याने त्यासाठी यंत्रणा निर्माण करून झाडांच्या परिस्थितीची नियमित तपासणी केली जाईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानपरिषदेत दिली.

# प्रविण गायकवाड यांना मारहाण करणाऱ्यावर कारवाई करावी

**राहुरी : हॅलो प्रभात**

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर शाही फेक करत मारहाण करणाऱ्या हल्लेखोरांवर कारवाई करावी. या मागणीसाठी दि. १५ जुलै रोजी राहुरी येथे संभाजी ब्रिगेड सह पुरोगामी समविचारी संघटनांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

प्रविण गायकवाड हे एका नियोजित कार्यक्रमासाठी जात असताना तेथे त्यांच्यावर जीव घेणा हल्ला करत त्यांना काळी शाई लावण्यात आली. या हल्ल्याचा संभाजी ब्रिगेड, पुरागामी चळवळीचे कार्यकर्त्यांकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आला. गेले ४० वर्षे सामाजिक क्षेत्रात बहुजन तरुणांना महामानवांचे शाहू-फुले-आंबेडकर अन्य क्रांतीकारी महापुरुषांचे विचारांचे प्रचाराचे समाज प्रबोधनाचे कार्य करणारे महाराष्ट्राचे मराठा बहुजन समाजाचे तरुणांना उद्योग व्यवसाय व अर्थकारणाची दिशा देणारे नेतृत्व प्रविण



गायकवाड यांचे असून त्यांची प्रेरणा व मार्गदर्शन सहकार्य अनेक उद्योजकांना लाभले आहे. त्यांच्यावर समाजातील विकृत मानसिकता असलेल्या गुंडांनी त्यांच्यावर पाळत ठेऊन गुंड दिपक सिताराम काटे व त्याचे साथीदार यांनी पूर्व नियोजित कट करुन शाई फेक करून भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जिवीतास धोका पोहोचविण्याचा इराद्याने हल्ला झाल्याचा संशय आहे.

हल्लेखोरांवर तातडीने कारवाई झाली नाही तर संभाजी ब्रिगेडसह सर्व पुरोगामी संघटनांच्या माध्यमातून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे राजेंद्र खोजे, शिवसेनेचे देवेंद्र लांबे, भारतीय स्वाभिमानी संघाचे जिल्हाध्यक्ष संजय संसारे, सामाजिक कार्यकर्ते शिरीष गायकवाड, साहित्यिक सत्येंद्र तेलतुंबडे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे डॉ. जालिंदर घिगे, सत्यशोधक लहुजी क्रांती सेनेचे कांतीलाल जगधने, वंचित प्रणित एकलव्य आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अनिल जाधव, रिपब्लिकन युवा सेनेचे चंद्रकांत जाधव, सुनील तनपुरे, यांच्यासह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

## कै. शिवाजीराव संधान यांच्या स्मृतिनिमित्त शालेय साहित्य वाटप

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कै.शिवाजीराव आनंदराव संधान यांच्या स्मृतिदिनानिमित्त कोपरगाव ज्येष्ठ नागरिक सेवा मंच व ज्येष्ठ महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण झाला असून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थांच्या कार्याचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.या वेळी कै.दगडू महाराज उपाध्ये यांच्याही स्मरणार्थ देखील साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान यांनी उपस्थित



राहून आपल्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल समाधान व्यक्त केले. आपणही रयतचे विद्यार्थी असल्याने कमवा आणि शिका सारख्या योजना जडणघडण होण्यासाठी मोलाच्या ठरल्या.स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद या प्रमाणे विद्यार्थिनींच्या आयुष्यात बदल घडण्यासाठी यथाशक्ती मदत करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ज्येष्ठ नागरिक मंचाच्या अध्यक्षा सुधाभाभी ठोळे, जेष्ठ नागरिक मंचचे विजय बंब, उत्तमभाई शाह, श्वेताताई कोठारी, मधुबालाताई उपाध्ये, कमलाताई उपाध्ये, डॉ. विलास आचारी, ज्येष्ठ महिला समितीच्या अध्यक्षा रजनीताई गुजराथी, सोनमताई कोठारी, पुष्पाताई कोठारी यांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी डॉ. सी. एम. मेहता कन्या विद्या मंदिर येथील प्राचार्या धनक मॅडम, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी शालेय साहित्य मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. समाजासाठी कार्यरत असलेल्या संस्था आणि व्यक्ती या माध्यमातून शिक्षणास हातभार लावत असल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

## रुग्णालयाचा कारभार बघून तनपुरे संतापले



**राहुरी : हॅलो प्रभात**

माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात अचानक भेट देऊन पाहणी केली. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून कामकाजाची माहिती घेतली. रुग्णालयात कुठलीच सुविधा उपलब्ध नसल्याने तनपूरे यांनी संताप व्यक्त केला. राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची होणारी हेळसांड सुरुच आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना व्यवस्थित उपचार मिळत नाही. रुग्णां बरोबर मृतदेहाची देखील विटंबना होत आहे. दोन दिवसा पूर्वी शहरातील हॉटेल व्यावसायिक राजेश नगरकर यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती.

त्यावेळी रुग्णालयाच्या ढिसाळ कारभारामुळे शवविच्छेदनासाठी तब्बल तीन तास उशीर झाला होता. त्यामुळे राजेश नगरकर यांच्या नातेवाईकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला होता.

सदर प्रकार प्राजक्त तनपूरे यांना समजला असता त्यांनी आज राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात अचानक भेट देऊन पाहणी केली. रुग्णांची होणारी हेळसांड व मृतदेहाची विटंबना या बाबत तनपूरे यांनी संताप व्यक्त केला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अडचणी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्यासमोर मांडल्या. श्री.तनपूरे यांनी तात्काळ वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा करून आवश्यक त्या सूचना केल्या.

त्यानंतर राहुरी नगरपरिषद कार्यालयातील अधिकाऱ्यांना शवविच्छेदन गृह परिसरात तातडीने स्वच्छता करण्यास सांगीतले. यावेळी राजेंद्र बोरकर, पांडूभाऊ उदावंत, अर्जुन बुऱ्हाडे आदि उपस्थित होते.

# रविवारी नगरमध्ये पत्रकारांसाठी कार्यशाळा

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

पत्रकारितेतील बदलते प्रवाह आणि मूल्यांची पूर्नस्थापना या विषयावर २० जुलै रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनासाठी सर्व पत्रकार व माध्यमांच्या प्रतिनिधींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.ही कार्यशाळा मीडिया प्रभाग, राजयोग शिक्षण आणि शोध प्रतिष्ठान, माऊंट आबू आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी




ईश्वरीय विश्व विद्यालय, अहिल्यानगर शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. ही कार्यशाळा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय शिवदर्शन भवन, ६३/४० महावीर नगर, सावेडी येथे होणार आहे. अनेक प्रवाह आणि नवीन आयाम पत्रकारितेमध्ये आणि माध्यमांमध्ये आले आहेत. बदलत्या प्रवाहात पत्रकारितेतील शाश्वत मूल्य कुठे तरी लोप पावत असल्याची जाणीव होत आहे. या मूल्यांना पुनर्स्थापित करण्याची पत्रकारितेतील बदलते प्रवाह आणि मूल्यांची पूर्नस्थापना आणि पेन ते पेनलेस (डिजिटल) पत्रकारितेचा प्रवास या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या संमेलनासाठी डॉ. शांतनू भाई, राष्ट्रीय समन्वयक, मीडिया प्रभाग, माऊंटआबू (राजस्थान) आणि प्रा. डॉ. सोमनाथ वडनेरे, जळगाव, मीडिया प्राध्यापक तसेच संमेलनात सहभागी ज्येष्ठ मीडिया प्रतिनिधींचेही मार्गदर्शन लाभणार आहे. नोंदणीसाठी ९८५०६९३७०५ या व्हॉटसप क्रमांकावर संपर्क साधावा.

## युवा ग्रामीण पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर विभाग पदाधिकाऱ्यांची निवड राष्ट्रीय अध्यक्ष गणेश रामराव कचकलवार यांच्या हस्ते पार पडली. जिल्हा संपर्कप्रमुख पदी किशोर जासूद व जिल्हा उपाध्यक्षपदी प्रवीण पाटील तर हातकणंगले तालुकाध्यक्षपदी उमेश पाटील (सावर्डे ) यांची निवड करण्यात आली. संघटनेमार्फत विविध घटकातील व समाजातील प्रत्येक घटकाच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर राहू असे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले. संघटनेची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवू अशी ग्वाही पदाधिकाऱ्यांनी दिली. संघटना मजबूत व सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहू संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक कामामध्ये सहभाग घेऊन उत्तम प्रकारे कार्य करू ते नवनीत पदाधिकाऱ्यांनी आपले मत व्यक्त केले.

## पार्थ युथ फाउंडेशनतर्फे रक्तदान व आरोग्य शिबिर

**पुणे : उमेद सुतार**

पार्थ युथ फाउंडेशन यांच्या वतीने आणि युवा नेते समीर वासवंड यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप यांचे आयोजन करण्यात आले. या दिवसभर चाललेल्या उपक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः रक्तदान शिबिरात एकूण ६४६ युनिट्स रक्त संकलित करण्यात आले, ही संख्या उल्लेखनीय आहे. मोफत आरोग्य शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासण्या केल्या, तर गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तकं, पेन यांसारखे साहित्य देण्यात आले. यावेळी बोलताना समीर वासवंड म्हणाले, समाजाच्या सेवेचा हा छोटासा प्रयत्न असून, माझा वाढदिवस नेहमीच सामाजिक उपक्रमांनी साजरा होतो.याकार्यक्रमासाठी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर, खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर, पुण्यनगरीचे कार्यक्षम नगरसेवक युवराज बेलदरे,सचिन मोरे आंबेगाव बुद्रुकचे सरपंच/ उपसरपंच अरुण राजवाडे संतोष ताठे, दिनेश कोंढरे, सिद्धार्थ वनशिव, दीपक बेलदरे, तानाजीराव दांगट, मंदाताई दांगट, अनिल कोंढरे ,अतुल दांगट सचिन दांगट, योगेश कोंढरे, तसेच सर्वपक्षीय अधिकारी पदाधिकारी व्यंको खोपडे, गोल्डनमॅन योगी धावडे, अर्चनाताई शहा, मंगेश घुले, मंगेश जाधव,स्वातीताई चिटणीस, सुप्रियाताई भूमकर,सुवर्णा ताई श्रीकृष्ण सावंत, तुषार पोकळे, मान्यवरांनी उपस्थिती लावली.

# सुब्रोतो फुटबॉल स्पर्धेमध्ये झील इंटरनॅशनल स्कूलचे यश

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या १५ वर्षाखालील जिल्हास्तरीय सुब्रोतो फुटबॉल स्पर्धेमध्ये झील इंटरनॅशनल स्कूलने सलग दुसऱ्या वर्षी द्वितीय क्रमांक मिळविला. झील इंटरनॅशनल स्कूलचा पहिला सामना संजय घोडावत स्कूल यांच्यासोबत झाला हा सामना झील इंटरनॅशनल स्कूल ने ३-० अशा फरकाने जिंकला. या सामन्यामध्ये युवराज बोकाडिया याने २ व ओम पाटील याने १ गोल नोंदविला. झील इंटरनॅशनल स्कूलचा द्वितीय सामना नवकृष्णाव्हॅली कुपवाड यांच्यासोबत झाला हा सामना झील इंटरनॅशनल स्कूल ने २-० अशा फरकाने जिंकला या सामन्यांमध्ये अविराज जोतराव व प्रथमेश कदम यांनी प्रत्येकी एक गोल



नोंदवत संघास विजय मिळवून दिला. झील इंटरनॅशनल स्कूलचा सेमी फायनलचा सामना अल्फोंसा स्कूल जत यांच्यासोबत झाला हा सामना झील इंटरनॅशनल स्कूल ने २-० अशाप्रकारे जिंकत अंतिम सामन्यांमध्ये प्रवेश मिळविला. या सामन्यांमध्ये श्रीराज शिंदे या खेळाडूने दोन गोल नोंदविले आणि संघास अंतिम फेरीमध्ये प्रवेश मिळवून दिला. झील इंटरनॅशनल स्कूलचा अंतिम सामना भारती विद्यापीठ विटा यांच्यासोबत झाला हा सामना भारती विद्यापीठ विटा यांनी पेनल्टी शूटआउट वर ३-२अशा फरकाने झील इंटरनॅशनल स्कूल वर विजय मिळविला. या संघास राष्ट्रीय फुटबॉल प्रशिक्षक सहदेव हुलवान यांचे मार्गदर्शन लाभले. संघास शाळेचे क्रीडा प्रमुख अभिनंदन गारे यांचे मार्गदर्शन लाभले. वरील संघाचे झील इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर संजय महाडिक, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.मेघाली नरगच्चे, शाळेचे समन्वयक अभय भिलवडे यांनी कौतुक केले.

# दूध व्यवसायामुळे मार्केटमध्ये पत तयार होते : महंत रमेशगिरी महाराज

## औताडे सोसायटीचे दूध संकलन केंद्र सुरू



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

पोहेगांवची बाजारपेठ मोठी आहे. परिसरात शेतकरी वर्ग जास्त असल्याने शेती पूरक व्यवसाय म्हणून दूध व्यवसायाकडे शेतकरी वळाले आहे.दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी एक पाऊल पुढे येऊन श्री चांगदेवराव गणपतराव औताडे पा. विविध कार्यकारी सेवा सोसायटी संचालित वसुबारस ऍग्रो प्रोसेसिंग प्रोडूसर कंपनीच्या माध्यमातून दूध संकलन केंद्राची सुरुवात झाली आहे. दुधाला योग्य भाव व खाद्याच्या दरात देखील पारदर्शक व्यवहार होणार आहे.निश्चितच पोहेगाव परिसरासाठी ही अभिमानाची आहे . दूध व्यवसायामुळे मार्केटमध्ये पत निर्माण होते असे प्रतिपादन जनार्दन स्वामी आश्रमाचे महंत रमेशगिरी महाराज यांनी केले.ते कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथे वसुबारस दूध संकलन केंद्राची सुरुवात करताना बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे होते.यावेळी स्वाध्वी शारदानंद गिरीजी माताजी, पवार महाराज, कोपरगाव बाजार समितीचे संचालक अशोकराव नवले, कोल्हे कारखान्याचे संचालक अशोक औताडे, उपसरपंच अमोल औताडे, माजी उपसरपंच प्रशांत रोहमारे, पोहेगाव पतसंस्थेचे अध्यक्ष दादासाहेब औताडे अदी उपस्थित होते.

संस्थेचे मार्गदर्शक नितिनराव औताडे म्हणाले, की दूध व्यवसायामध्ये भरभराटी व्हावी म्हणून याआधीही पोहेगाव पतसंस्थेच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना आधार दिला आहे. आजही दूध उत्पादकांना केवळ प्रोत्साहनापर १२ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत दिलीप औताडे यांनी केले तर आभार संजय औताडे यांनी मानले.

# सूक्ष्म सिंचनातून शाश्वत शेतीकडे वाटचाल करा : अरुण देशमुख

## डॉ.डी.वाय.पाटील बीटेक ग्री येथे मार्गदर्शन संपन्न



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

बदलत्या हवामान व सामाजिक परिस्थितीमध्ये शेतीला आधुनिकतेची जोड देणे अत्यंत आवश्यक आहे. जलसिंचनाचे विविध प्रकार, स्वयंचलित उपकरणे, तसेच स्मार्ट शेती पद्धती यांचा प्रभावी वापर काळाची गरज बनली आहे. डिजिटल शेती आणि सूक्ष्म सिंचनातून शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी असे आवाहन नेटाफिम इरिगेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पुणेचे कृषिशास्त्र विभाग प्रमुख अरुण देशमुख यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ. डी. वाय. पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, तळसंदे येथे आधुनिक सूक्ष्म सिंचन आणि डिजिटल शेती पद्धती याविषयी मार्गदर्शन करताना देशमुख बोलत होते. बदलत्या काळाप्रमाणे शेतीमध्ये देखील अमुलाग्र बदल होत आहेत. वेगवेगळ्या जलसिंचन पद्धती त्याचबरोबर स्वयंचलित यंत्रांचा शेती मधला वापर हा येणाऱ्या काळामध्ये गरजेचा झाला आहे. कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून डी वाय पाटील ग्रुप कायमच नवनवीन तंत्रज्ञान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहे हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. नेटाफिम सारख्या मार्केटमध्ये साठ वर्ष काम करणाऱ्या कंपनीची कार्यपद्धती तसेच त्यांचे शेती उपयोगी तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन काळातच मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अरुण देशमुख यांचा सत्कार डी.वाय.पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ.संजय डी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित 'ट्रान्सफोर्मिंग हायर एज्युकेशन अ जर्नी इनटू न्यू डायमेन्शन' हा ग्रंथ देऊन करण्यात आला. शेतीमधील बदलत्या तंत्रज्ञानाचा मागोवा घेताना देशमुख यांनी शेतकरी वर्गाचा देश उभारणीतील सहभाग सांगून सूक्ष्म सिंचन पद्धती ही येणाऱ्या काळामध्ये किती गरजेची आहे याविषयी मार्गदर्शन केले. प्रत्येक गोष्ट पैशासाठी न करता आपल्या कामाच्या माध्यमातून आपण समाजाचे ऋण फेडताना पैसा आपोआपच आपल्या मागे येतो असे मत व्यक्त केले. बदलत्या आधुनिक जीवनामध्ये सर्व क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान झपाट्याने वाढत आहे. या काळात शेती क्षेत्र बाजूला राहू शकत नाही. पाणी, खत, जमीन, बियाणे तसेच मजूर या सर्वांचे व्यवस्थापन करताना तंत्रज्ञान वापरणे गरजेचे असून त्याद्वारे कमीत कमी स्त्रोतांचा वापर करून अधिकाधिक उत्पादन घेता येईल. असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पाटील, उपप्राचार्य प्रा. प्रविण उके तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर डॉ.योगेश शेटे आणि प्रा.संदीप पाटील यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील तसेच कार्यकारी संचालक डॉ.ए.के. गुप्ता यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात पतसंस्था फेडरेशनची भूमिका महत्त्वपूर्ण : काका कोयटे

## मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर समितीची बैठक संपन्न



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

केंद्र सरकारच्या सूचनेवरून आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत विविध सहकारी उपक्रमांच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा झाली.या बैठकीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष काका कोयटे यांनी फेडरेशनच्या उपक्रमांची सविस्तर माहिती सादर केली. याशिवाय, बुलढाणा येथे पतसंस्थांच्या अधिकारी, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याची घोषणा करण्यात आली. तसेच 'गाव तेथे सहकार चौक' ही अभिनव संकल्पना सादर करून प्रत्येक गावात सहकाराचे केंद्र उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आला.आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सहकारी पतसंस्थांच्या कायद्यात अमुलाग्र बदल करावे. सहकारी पतसंस्थाविषयीच्या कायद्यात बदल करताना राज्य सरकारच्या समितीत राज्य फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांचा देखील विचार करण्यात यावा. तसेच राज्य फेडरेशनच्या सिबिल सारख्या क्रास प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार खात्याने सहकार्य करण्याची इच्छा राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी व्यक्त केली. तसेच अमेझॉन, फ्लिपकार्ट यासारख्या कंपन्यांच्या धरतीवर राज्य फेडरेशन देखील सहकार बास्केट ही नवीन संकल्पना सहकार क्षेत्रात रुजवत असून राज्य शासन व सहकार खात्याने देखील या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करावे. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत सहकारी पतसंस्थांचे अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी पदविका अभ्यासक्रम लवकरच सुरू करण्यात येणार असून या उपक्रमाला सहकार खात्याने सहकार्य करण्याचे आवाहन राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी केले.या बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार आयुक्त दिपक तावरे, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुरेखा लवांडे आणि विविध वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शासन आपल्या दारी संकल्पनेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : शहाजी पाटील




**चिखली : हॅलो प्रभात**

येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज चिखली मधील राष्ट्रीय सेवा योजना व सांगली जिल्हा बार्टी, सारथी, महाज्योती व अमृत या संस्थांमार्फत विद्यार्थी सहाय्य जनजागृती उपक्रम संपन्न झाला. देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज चिखली आणि राष्ट्रीय सेवा योजना व सांगली जिल्हा बार्टी,तार्टी, (आदिवासी विभाग) सारथी, महाज्योती व अमृत या संस्थांमार्फत विद्यार्थी सहाय्य जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे वक्ते शहाजी पाटील उपस्थित होते.

ते मनोगत व्यक्त करताना म्हणाले की सर्व संस्थांचा प्रमुख उद्देश सामाजिक ,शैक्षणिक, आर्थिक विकास हा आहे. बार्टी तार्टी, सारथी , महाज्योती,अमृत या संस्थांमार्फत विद्यार्थी कशाप्रकारे निधी,शिष्यवृत्ती मिळवू शकतात. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड कशी केली जाते.प्रशिक्षण कसे दिले जाते, त्यांचा कालावधी किती असतो, तसेच एम.पी. एस.सी. यू.पी.एस.सी. अभियांत्रिकी ,बँकिंग ,सेट,नेट , पीएच.डी. देशांतर्गत व परदेशी शिक्षण तसेच कौशल्य विकास योजना स्वयंरोजगार योजना, कृषी विभाग यातून कौशल्य आधारित व्यवसाय आपण कसे करू शकतो याबाबत सखोल मार्गदर्शन केले. डॉ. प्रशांत जाधव यांनी व्यसनाधीनता आणि आजची तरुणाई याविषयी बोलताना व्यसनापासून जितके दूर राहाल तितकी स्वतःची प्रगती कराल हे सांगताना मनो रुग्णता या विषयावर सखोल चर्चा केली.प्रमुख उपस्थिती असणारे श्री. रवींद्र पाटील हे सारथी या संस्थेचे काम पाहतात. त्यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी बाबत आम्ही अडचणी दूर करण्यासाठी सदैव तत्पर आहोत.असा आशावाद व्यक्त केला. यावेळी डॉ.एस.डी सूर्यवंशी,डॉ. एम. एम. हिरेमठ डॉ. जी.एस. खानसोळे, प्रा. दीपक तडाखे आदी शिक्षक शिक्षकेतर सेवक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आसद सोसायटीच्या अध्यक्षपदी संपत जाधव ; उपाध्यक्षपदी जोतिराम जाधव



**देवराष्ट्रे: हॅलो प्रभात**

आसद .(ता.कडेगाव) येथील आसद सर्व सेवा सोसायटीच्या चेअरमन पदी संपतराव आनंदा जाधव व व्हा. चेअरमनपदी जोतिराम रामचंद्र जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात. चेअरमन संजय जाधव तसेच व्हा. चेअरमन इनुस मुलानी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त पदासाठी निबंधक कार्यालय कडेगावचे विजय गोंदकर यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी सोनहिरा कारखान्याचे संचालक पी सी जाधव, सरपंच मोहन जाधव, मा. चेअरमन संजय जाधव, उपसरपंच नंदकुमार जाधव, प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना पीसी जाधव म्हणाले आसद सर्व सेवा सोसायटीची वाटचाल विकासाच्या दिशेने चालू आहे. संस्थेची वसुली शंभर टक्के असून संस्था नेहमी अ वर्गात आहे. नूतन पदाधिकाऱ्यांनी सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्थेचे नावलौकिक वाढवण्याचे काम करावे. यावेळी तंटामुक्तीचे अध्यक्ष सुरेश जाधव, मा.चेअरमन प्रमोद जाधव, टी.एम. जाधव,सुहास जाधव, वैभव जाधव, शरद जगदाळे,सागर जाधव, यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक सभासद उपस्थित होते.

# गोकुळ'चे दुग्धव्यवसाय क्षेत्रातील योगदान मोलाचे

**मंत्री मुरलीधर मुरलीधर**



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गोकुळसारख्या सहकारी संस्थेचे दुग्धव्यवसाय क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे आहे. सहकार क्षेत्र बळकट करण्यासाठी केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयामार्फत गोकुळला आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.स्व.शंकरराव उर्फ बुवा साळवी चषक पुणे लिग कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते शिवछत्रपती क्रीडानगरी, बालेवाडी येथे बोलत होते. यावेळी गोकुळचे नवनियुक्त चेअरमन नविद मुश्रीफ यांचा सत्कार मंत्री मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना मंत्री मोहोळ म्हणाले, दूध, आरोग्य आणि खेळाडू यांच्यात अतूट नातं आहे. खेळाडूंनी सकस आहारासाठी दर्जेदार दूध घेणे गरजेचे आहे. युवक, विद्यार्थी व क्रीडापटूंनी दूधाचा नियमित वापर करावा. सहकार, आरोग्य आणि युवकविकासासाठी गोकुळसारख्या संस्थांनी पुढाकार घ्यावा.यावेळी नविद मुश्रीफ म्हणाले, गोकुळ हा महाराष्ट्राचा ब्रँड आहे. आम्ही महिलांना, युवकांना आणि खेळाडूंना उत्तम दर्जाचे व नैसर्गिक पोषणमूल्य असलेले दूध देण्यासाठी वचनबद्ध आहोत. केंद्रीय मंत्रींच्या सहकार्यामुळे आमचे उपक्रम अधिक गतिमान होतील.ही स्पर्धा केवळ क्रीडाक्षेत्रापुरती मर्यादित नसून तरुणांना व्यासपीठ, शिस्त व संघभावना देणारा उपक्रम असल्याचे सांगण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाहक बाबुराव चांदेरे, पुणे शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष समीर चांदेरे आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर यांनी केले होते.कार्यक्रमास सुभाष जगताप, प्रमोद भानगिरे, सुनिल चांदेरे, नासिर सय्यद, अर्जुन शिंदे, माणिक गांधीले, सोमनाथ धनकुडे, आप्पासाहेब दळवी, विश्वनाथ पाटोळे, नंदकुमार जाधव, रामदास धनकुडे, संतोष भुजबळ, रामदास चाळणकर, किरण चांदेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# खासगी दवाखान्यांना दरपत्रक लावण्याच्या सूचना




जॉन नवगिरे यांच्या उपोषणाने प्रशासनाला आली जाग

**कुर्डूवाडी : अंकुश आतकर**

कुईवाडी शहरासह माढा तालुक्यातील खासगी दवाखान्यात शासनाच्या निर्णयानुसार दरपत्रक लावणे बंधनकारक आहे, तसे न केल्यास संबंधित दवाखान्याचे परवाने रद्द होतील, असे आदेश असतानाही प्रत्यक्षात मात्र तसे होताना दिसून येत नाही. याबाबतची अंमलबजावणी शहरातील आरोग्य विभागाने तातडीने करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते जॉन नवगिरे चांनी प्रांत अधिकारी कार्यालयासमोर दिवसभर उपोषण केले.यावेळी प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड यांनी संबंधित आरोग्य विभागाला याबाचत सूचना दिल्यानंतर सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास उपोषण मागे घेण्यात आले. कुईवाडी शहर व माडा तालुक्यातील अनेक खासगी दवाखान्यात दरपत्रक नसल्याने सर्वसामान्य व गरीब रुग्णांची अवहेलना व हेळसांड होत आहे. त्याबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते जॉन नवगिरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. यावेळी प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड यांच्याकडून उपोषणकर्त्याला शासनाचे परिपत्रक देण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

> कुर्डूवाडी शहरातील सर्व खासगी दवाखान्यात शास्नाच्या निर्णयानुसार दरपत्रक लावणे बंधनकारक आहे. त्याबाबत सर्वांना लेखी सूचना दिल्या आहेत.
>
> **–सुनंदा गायकवाड,**
> **प्रभारी वैद्यकीय अधीक्षक**

# इनोव्हेशन ऑर प्रोटोटाईप व्हालीडेशन विषयावर सेमिनार



**पुणे : हॅलो प्रभात**

येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विभाग व अंतर्गत गुणवत्ता कक्ष आणि इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन सेल यांचे संयुक्त विद्यमाने इनोव्हेशन ऑर प्रोटोटाईप व्हालीडेशन या विषयावर माहाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सेमिनार चे आयोजन करण्यात आले होते. इनोव्हेशान क्लबचे सदस्य श्री सुदर्शन नातू यांनी विद्यार्थ्यांना नवकल्पनांची संकल्पना, त्याचे व्यावसायिक परिणाम, व प्रोटोटाइपच्या चाचणीची प्रक्रिया यावर सविस्तर मार्गदर्शन केले या सेमिनारच्या माध्यमातून विद्यार्थी आणि नवउद्योजकांना उद्योजक क्षेत्राची गरज, अर्थसहाय्य, कुशल मनुष्यबळ, बाजारपेठेची मागणी या विषयी योग्य दिशा व प्रेरणा मिळाली. आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानयुक्त आणि स्पर्धात्मक युगात नवोपक्रम हे केवळ कल्पनेपुरते मर्यादित न राहता, प्रत्यक्षात साकार करून त्याचे परिणाम तपासण्यासाठी प्रोटोटाइप पडताळणी ही त्या प्रक्रियेतील एक महत्त्वाची पायरी आहे, जी कोणत्याही नवकल्पनेच्या व्यावहारिकता, कार्यक्षमतेची चाचणी घेण्यासाठी उपयुक्त ठरते. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, समस्या सोडवण्याचे कौशल्य, आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत होईल असे मार्गदर्शन केले.या सेमिनार चे नियोजन समन्वयक प्रा. तुषार झोंबडे यांनी केले.या सेमिनार साठी श्री. सुदर्शन नातू, प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे, प्रा.गणेश कोंढाळकर, विभाग प्रमुख डॉ.अमर देशमुख, समन्वयक प्रा. तुषार झोंबडे प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाने या सेमिनारचे आयोजन केल्याबद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# व्यसनमुक्त समाज ही समाजाची खरी संपत्ती : आझाद जमादार




**सांगली : हॅलो प्रभात**

आजची पिढी विविध अमली पदार्थांच्या आहारी जाऊन तब्बेतीचा विनाश ओढवून घेत आहे. व्यसनमुक्त समाज हीच समाजाची खरी संपत्ती आहे, ही बाब विचारात घेऊन शासनाने व्यसनमुक्त आणि सुदृढ युवा पिढी निर्माण करण्याचा ध्यास घेऊन विविध अमली पदार्थांच्या सेवना विरुद्ध अभियान सुरू केले आहे अशी माहिती शासनाचे प्रतिनिधी आझाद जमादार यांनी दिली

ते येथील नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज मध्ये सांगली जिल्हा बार्टी, टर्शटी, सारथी, महाज्योती, आणि अमृत संस्था व कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या विद्यमाने आयोजित 'विद्यार्थी सहाय्य जनजागृती कार्यक्रम आणि अमली पदार्थ विरोधी अभियान' कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत पाटील होते सुरवातीला कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब कोटलगी यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. पाहुण्याचा परिचय पी. डी. पाटील यांनी करून दिला. त्यानंतर प्राचार्य डॉ.पाटील यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे जमादार आणि गणेश सव्वाखंडे यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. पाटील यांनी मनोगत मांडताना युवकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त आणि अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन केले आणि विद्यार्थ्यांनी त्याची माहिती घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन गीता शेटे यांनी केले तर आभार डॉ.शिवप्रसाद शेटे यांनी मानले.

# गुंठेवारी प्लॉट व झोपडपट्टी धारकांची घरे त्यांच्या नावावर करा

## आ.गाडगीळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील गुंठेवारी प्लॉट, भूखंडधारक तसेच झोपडपट्टीधारकांची घरे/जागा नियमित करावीत. ती घरे/जागा त्यांच्या नावावर कराव्यात, अशी मागणी आमदार सुधीर दादा गाडगीळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याबरोबर चर्चा केली.

आमदार गाडगीळ यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की सांगली, मिरज, कुपवाड महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंठेवारी प्लॉट धारक, भूखंड धारक तसेच झोपडपट्टी धारक राहत आ-हेत. गेल्या अनेक वर्षापासून ते त्या ठिकाणी वास्तव्य करीत



आहेत. परंतु घरे आणि जागा त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना,कामगार विभागाच्या योजना यांचा लाभ घेताना विविध अडचणी येत आहेत.

हे सर्व रहिवासी अशा विविध योजनांकरता पात्र असू-नही त्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळत नाहीत. यासंदर्भात येथे सर्व रहिवासी नागरिक तसेच झोपडपट्टी पुनर्वसन समिती खूप आग्रही आहेत.

ही घरे नियमित करून त्या त्या भूखंड धारक, प्लॉट धारक आणि झोपडपट्टी धारकांच्या नावावर झाल्यास त्यांना केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता येईल. त्यासाठी शासनाने हे भूखंड,जागा आणि घरे त्यांच्या नावावर करण्यासाठीचा निर्णय घ्यावा.

# स्कोडा ऑटोने गाठला ३०० ग्राहक टचपॉइण्ट्सचा टप्पा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्कोडा ऑटो नवीन स्तरावर झेप घेत आहे, जेथे भारतात २५ वर्षांचा वारसा आणि जागतिक स्तरावर १३० वर्षे साजरी करत आहे. या महिन्या च्या सुरूवातीला ब्रँडने २०२५ च्या पहिल्या सहाम ाहीत आतापर्यंतची सर्वोच्च सहाम ाही विक्री संपादित केली. आणखी एका यशामध्ये कंपनीने ३०० ग्राहक टचपॉइण्ट्सचा टप्पा पार केला आहे, जेथे भारतातील १७२ शहरांमधील ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करत आहे. स्कोडा ऑटोच्या भारतातील विकास धोरणामध्ये अद्वितीय ग्राहक अनुभव महत्त्वाचा आहे.




झपाट्याने होत असलेल्या नेटवर्क विस्तारीकरणामधून ही बाब दिसून येते, तसेच प्रबळ गतीसह ब्रँड भारतभरात आपली उपस्थिती दृढ करत आहे.

या यशाबाबत मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, 'आमचे वाढते नेटवर्क आमच्या उत्पादन श्रेणीला ग्राहकांसाठी अधिक सहजसाध्य करते, तसेच देशभरात सातत्यपूर्ण दर्जासह स्म ार्टपणे, गतीशीलपणे सर्विस देते. 'सहयोगाने विकास आणि ग्राहकांच्या जवळ पोहोचणे' यावर प्रबळ भर देत भारतातील स्कोडा ऑटोच्या दीर्घकालीन डीलर सहयोगींनी आमच्या विस्तारीकरणामध्ये मोठे योगदान दिले आहे.

# मल्लखांब स्पर्धेत छत्रपती शिवाजी विद्यानिकेतनचे यश

**पेठ वडगाव : हॅलो प्रभात**

सह्याद्री एज्युकेशन सोसायटी,अंबप संचलित छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनि. कॉलेज आणि दिशा इंग्लिश मेडियम स्कूल पेठवडगाव या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना व सांगली जिल्हा मल्लखांब संघटना यांच्या मान्यतेने आष्टा येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय म ल्लखांब स्पर्धेत नेत्रदीपक यश संपादन केले.



प्रशालेच्या हर्षवर्धन निलेश सावंत याने स्पर्धेत १२ वर्षाखालील वैयक्तिक गटात प्रथम क्रमांक मिळवला तसेच १२ वर्षाखालील प्रशालेच्या मल्लखांब संघाने या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेतील यशस्वी खेळाडू हर्षवर्धन सावंत,राजवीर पाटील,शिवम माने,करण नाईक,सोहमसिंग राजपूत या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष व मुख्याध्यापक राजेंद्र माने व संस्थेच्या सचिवा व वारणा बँक संचालिका सुवर्णा माने यांचे प्रोत्साहन लाभले आणि प्रशालेचे व्यवस्थापक व जिमखाना विभाग प्रमुख आनंद पाटील,मल्लखांब क्रीडा प्रशिक्षक सुजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच मिलिटरी इन्स्ट्रक्टर मेजर राजेंद्र पाटील,कॅप्टन सुरेश आडसूळ,प्रशालेचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक,प्रशिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# भिमगोंडा कर्नवाडी यांना कर्मवीर शिक्षण पुरस्कार तर सुरेश बहिरशेट यांना जीवन गौरव पुरस्कार

**सांगली : हॅलो प्रभात**

दक्षिण भारत जैन सभेचे त्रैवार्षिक महाधिवेशन रविवार (ता.२०) व सोमवार (ता.२१) रोजी हारूगेरी (ता.रायबाग) येथील श्री आदिनाथ समुदाय भवन येथे होत आहे. अध्यक्षस्थानी दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील हे भूषविणार असून या त्रैवार्षिक अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष युवा नेते उत्तम रावसाहेब पाटील हे आहेत.

सोमवार (ता.२१) रोजी सभेच्यावतीने देण्यात येणारा डॉ. कर्मवीर भा. पाटील शिक्षण सेवा पुरस्कार जनता एज्युकेशन सोसायटीचे भिमगोंडा व. कर्नवाडी यांना आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. तसेच श्रावकरत्न रावसाहेब पाटील





जीवन गौरव पुरस्कार मुंबई येथील नामवंत उद्योगपती सुरेश भूपाल बहिरशेट यांना आमदार अभय पाटील यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. यावेळी पद्मभूषण क्रांतिवीर ना-गनाथआण्णा नायकवडी समाजसेवा पुरस्कार विजय बाबूराव कोगनोळे (कवठे एकंद) यांना आमदार राहूल आवाडे यांच्या तर श्री अरिहंत क्रेडिट सौहार्द सह.आदर्श संस्था पुरस्कार महावीर मल्टिपर्पज क्रेडिट सौहालर्द सह. लि. संस्थेला माजी खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. यांच्यासह विविध क्षेत्रातील २३ मान्यवरांना पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी कर्नाटक राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व बेळगावचे पालकमंत्री नाम दार सतिश जारकीहोळी व कर्नाटक राज्याचे नियोजन व सांख्यिकी मंत्री नामदार डी. सुधाकर हे प्रमुख अतिथी, माजी खासदार डॉ. प्रभाकर कोरे, आमदार लक्ष्मण सवदी, आमदार महेंद्र तमण्णावर, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार अभय पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह खासदार कु. प्रियांका जारकीहोळी, आमदार प्रकाश हुक्केरी, आमदार राजू कागे, आमदार सौ. शशिकला जोल्ले, आमदार राहूल आवाडे, आमदार दुर्योधन ऐहोळे, आमदार गणेश हुक्केरी, आमदार निखिल कत्ती, आमदार लखन जारकीहोळी, आमदार चन्नराज हट्टीहोळी, माजी मंत्री प्रकाश आवाडे, माजी मंत्री वीरकुमार पाटील, माजी खासद-ार रमेश कत्ती, माजी मंत्री श्रीमंत पाटील, माजी आमदार शाम घाटगे, पी.राजू, महंतेश कवटगीमठ, महेश कुमठोळी, संजय पाटील, विवेकराव पाटील, कल्लाप्पा मगेण्णावर, म ोहन शहा, सुभाष जोशी यांच्यासह कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील विविध आर्थिक व सामाजिक संस्थांचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# वाणिज्य क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी : तुषार कवडे

**तासगाव : हॅलो प्रभात**

सध्याच्या युगामध्ये देश तसेच विदेशात देखील वाणिज्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत असे उद्गार सीएमए तुषार कवडे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालत कॉमर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या 'कॉस्ट अँड वर्क्स अकाउंटंट एक संधी' या कार्यक्रम ात बोलताना काढले.




याप्रसंगी त्यांनी आयसीएमए या संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या सीएमए या व्यावसायिक कोर्स बद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली यामध्ये फाउंडेशन, इंटरमीडिएटरी व फायनल परीक्षा कशा पद्धतीने होते तसेच यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता याबाबत त्यांनी सखोल असे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना सीएमए बनण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले यासाठी सीएमए कोल्हापूर चाप्टर च्या वतीने सर्व ते सहकार्य विद्यार्थ्यांना केले जाईल याबाबत त्यांनी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य जे. ए. यादव हे होते. त्यांनी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध आहेत त्यापैकी एक सीएमए ही संधी आहे त्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावरती ही पदवी संपादन करावी असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अमोल सोनव-ले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नेहा मोरे यांनी केले तर आभार डॉ.श्रुती परचूरे यांनी मानले.

या कार्यक्रमाला म हाविद्यालयातील डॉ. साईनाथ घोगरे, डॉ. कुलदीप पाटील, डॉ. बंडू कदम, डॉ. वलेकर, प्रा.सुनिता यमगर तसेच वाणिज्य विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिपक शिंदे पुणे शहर पोलिस दलात दाखल

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**



घाटनांद्रे येथील माजी सैनिक दिपक विठ्ठल शिंदे यांची निवड निकषाद्वारे पुणे शहर पोलिस दलात निवड झाली असून त्यांच्या या निवडीचे परिसरातून मोठे कौतुक केले जात आहे. पुणे शहर पोलिस दलात रिक्त असलेल्या पोलीस शिपाई चालक पदाकरीता पोलिस भरती २०२२-२३ ही माहे जून २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत राबविण्यात आली होती.सदर चालक पोलिस भरती दरम्याने लेखी परीक्षा,वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणी व मैदानी चाचणी यामधील होणाऱ्या यशस्वी निकषांवरच ही निवड करण्यात आली आहे.

# कोरे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची ऑस्ट्रेलियाच्या विद्यापीठात निवड

**वारणानगर : हॅलो प्रभात**

तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (ऑटोनोमस) मधील दोन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश संपादन केले असून त्यांचा महाराष्ट्र शासनाच्या परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सिडनी विद्यापीठ ऑस्ट्रेलिया (जगातील १८ वा क्रमांकाचे विद्यापीठ) येथे एम एस अभ्यासक्रम ासाठी प्रवेश मिळाला आहे.



मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा ओंकार श्रावस्ती याला ९५ लाख रुपयांचे शिष्यवृत्ती तर कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग विभागातील कुमारी प्रतीक्षा कांबळे हिला ९१ लाख रुपयांचे शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झाली आहे.

या दोघांचेही अभिनंदन व सत्कार श्री वारणा विविध उद्य-ोग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.विनयरावजी कोरे व श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.विलास कारजिन्नी यांनी केले. त्यांच्या यशामागे महालक्ष्मी अर्कॅडमी कोल्हापूर यांचे प्रभावी मार्गदर्शन मोलाचे ठरले.

# अशोकराव माने इन्स्टिट्यूटमध्ये करिअर मार्गदर्शनास प्रतिसाद



### ७००० हून अधिक विद्यार्थी-पालकांना केले मार्गदर्शन

**वाठार : हॅलो प्रभात**

अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स आयोजित अभियांत्रिकीमधील करिअर संधी व प्रवेशप्रक्रिया मार्गदर्शन शिबिरास विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गेल्या तीन-चार म हिन्यांपासून सुरू असलेल्या या करिअर मार्गदर्शन शिबिरामध्ये कोल्हापूर, सांगली, सात-ारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांतून ७००० हून अधिक विद्यार्थी-पालकांना याचा लाभ झाला.

शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक वक्ते उपप्राचार्य प्रा. पी. बी. घेवारी यांनी सहभागी विद्या-र्थी-पालकांना करिअर निवड, अभियांत्रिकी मधील करिअर संधी, बदलता अभ्यासक्रम, विविध शाखांची माहिती, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे महत्त्व आदी विषयांवर विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

जनसंपर्क अधिकारी डॉ.दिग्विजय पवार, प्रा.राहुल पसाले, प्रथम वर्ष विभागप्रम ुख डॉ.अमोल सूर्यवंशी यांनी विविध सत्रांद्वारे अभियांत्रिकी प्रवेशप्रक्रियाड्ढ याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया, कॅप राऊंडमधील महत्त्वाचे बदल, शिष्यवृत्ती योजना, आवश्यक कागदपत्रे आदींचा समावेश होता.

शिबिराचे आयोजन डीन स्टुडंट्स अफेअर्स डॉ.जे.एम .शिंदे व कॉम्प्युटर सायन्स विभागप्रमुख प्रा.सुरज रेडेकर यांनी केले. शिबिरातील विविध सत्रांचे सूत्रसंचालन प्रा.गणेश लोळगे यांनी केले. सदर शिबिराद्वारे करिअरची दिशा ठरविण्यासाठी अचूक व नेमके मार्गदर्शन झाल्याची प्रतिक्रिया विविध विद्यार्थी-पालकांनी दिली.

# केंब्रिज स्कूलच्या मुलींचे फुटबॉल स्पर्धेमध्ये यश

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने ११ व १२ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर सुब्रोतो मुखर्जी जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टच्या केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने जिद्द, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.

१५ जुलै २०२५ रोजी शाळेच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी कॅम्पस समन्वयक सतीश पाटील, मुख्याध्यापिका ख्रिस्तीना मार्टिन मॅडम, प्रशासक रफिक तांबोळी सर, उपमुख्याध्यापिका पद्मा सासनूर मॅडम व शाळा समन्वयक अश्विनी येळकर मॅडम यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामागे सतत मैदानावर प्रत्यक्ष मार्गदर्शन करणारे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रमुख अमोल जाधव, चंद्रशेखर मिरजे, राजेश कुरणे, दीक्षा पोळ व समीर मुजावर यांचे मोलाचे योगदान लाभले. संस्थेचे चेअरमन पृथ्वीराज पाटील व विश्वस्त वीरेंद्रसिंह पाटील हे विद्यार्थ्यांना खेळ, योग आणि शारीरिक शिक्षण यासाठी सदैव प्रेरणा देणारे मार्गदर्शक आ-हेत. त्यांनीही सर्व विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



# लोकसंख्येच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ महत्वाची

**डॉ.मनोहर कोरे**

**तासगाव : हॅलो प्रभात**

भारतासारख्या लोकशाही देशात उत्पादक लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे.विकसित भारताच्या निर्मितीसाठी एकूण लोकसंख्येच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ महत्वाची आहे.यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे मत डॉ.मनोहर कोरे यांनी व्यक्त केले.ते तासगाव येथील पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्त-ाने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी




विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे सह सचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे होते.

यावेळी बोलताना डॉ.मनोहर कोरे म्हणाले,भारताच्या लोकसंख्या वाढीची गती प्रचंड आहे.स्त्री पुरुष प्रमाण १००० पुरुषामागे ९४५ स्त्रिया असे प्रमाण आहे यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. जागतिकीकरणानंतर भारतात उत्पादक गटातील लोकसंख्या सर्वाधिक आहे.याचा योग्य पद्धतीने वापर होणे आवश्यक आहे.तरच विकसित भारत निर्माण होऊ शकेल. सदृढ राजकीय नेतृत्व आणि जनतेची साथ मिळाली तर विकसित भारत निर्माण होईल.

लोकसंख्येची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे आपण काय यो-गदान देवू शकतो याचा विचार जनतेने केला पाहिजे.कोरोणा नंतर भारता-तील राजकीय परिस्थिती मुळे परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढली नाही.

यावेळी डॉ.कोरे यांनी जागतिक लोकसंख्या वाढीचा आढावा घेतला.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे म्हणाले, लोकसंख्या हा विषय मानवी जीवनातील सर्वच क्षेत्राशी निगडित आहे.

तरुणाचा देश म्हणून भारताची ओळख आहे.शासनाचे तरुणाच्या साठी धोरण सकारात्मक आहे. धोरण निर्माण करताना अनेक बाबी लक्षात ठेवून धोरण ठरविले पाहिजे.तरुणांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जे.ए. यादव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. कुलदीप पाटील यांनी करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. पी. व्ही वलेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.

कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख अमोल सोनवले, डॉ. शहाजी पाटील, डॉ. साईनाथ घोगरे,डॉ. विलास साळुंखे, डॉ. अमित माळी, डॉ. रामा रोकडे, डॉ. बंडू कदम,प्रा. शामल पाटील यांचे सह सर्व गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.